Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V Issue – VI April 2017

# नाशिक जिल्हयातील निवडक कृषी उत्पन्न बाजार समितीमधील भाजीपाला विपणनाच्या समस्या आणि प्रगतीचे अध्ययन सन २००१ — २०१०

श्रीमती नागरे मिनाक्षी जू.,
उपशिक्षिका,
डी. डी. बी. बी. एच. एस. ॲण्ड ज्युनिअर कॉलेज,
नाशिक.

**शोध निबंध रचना**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावना | २. | साहित्य पडताळा |
| ३. | समस्या विधान | ४. | संशोधन विषयाचे अभ्यासाचे महत्व |
| ५. | संशोधनाचे उद्दिष्टये | ६. | संशोधनाचे गृहितके |
| ७. | संशोधन पध्दती | ८. | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा |
| ९. | निष्कर्ष | १०. | संदर्भ सूची |

*गोषवारा —*

*कृषि विपणन व्यवस्थेमध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची भूमिका अत्यंत महत्वाची वाटते. यासाठी त्याचा अभ्यास करण्याचे गरजेचे वाटते. भारतीय शेतक—यासाठी शेती हे उदरविर्नाहाचे साधन आहे. त्यांच्याकुटूंबाचा विकास शेतीवरच अवलंबून असल्यामुळे शेतक—याने उत्पादित केलेल्या शेतीमालास योग्य भाव मिळाल्याशिवाय त्यांच्या शेतीचा, कुटूंबाचा पर्यायाने ग्रमीण भागाचा विकास शक्य होणार नाही. त्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीतील कृषी विनणन व्यवस्थेतील दोषांचा सुक्ष्म अभ्यास करून ठोस उपाययोजना करणे व सध्याच्या उपलब्ध उपयांची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. असे केले तरच शेतक—यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळेल व ग्राहकास त्याला हवा असलेला शेत माल योग्य दरात मिळेल.*

**महत्वाचे शब्द —** कृषी उत्पन्न बाजार समिती व विपणन

१. **प्रस्तावना** — भारत देश पारंपारिक कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जात आहे. सेवाक्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्राची कितीही भरभराट झाली तरी आजही भारतातील १९४७ चे आकडेवारी नुसार ७० टक्के लोक शेतीवर आणि शेतीवर आधारित व्यावसायांवर जीवन जगत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणा—या शेती व्यवसायाला उद्योगाचे

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V Issue – VI April 2017

स्वरूप आणण्याठी स्वातंत्र्यानंतरच्या काळात भरपूर प्रयत्न करण्यात आले. यामध्ये सरकार यशस्वी झाले. क्रम प्राप्त परिस्थिती केलेल्या सर्वेक्षणातुन असे लक्षात आले की, शेती मालाची बाजार भाव ठरविणारी यंत्रणा अस्तित्वात नाही, परिणामी शेतीच्या किंमतीबाबत शेतक—यांना न्याय मिळत नाही. यासाठी वेगवेगळी यंत्रणा निर्माण करून जे शेतक—यांच्या मालाशी खरेदीविक्री व्यवहार संभाळतील त्यांना खरेदीविक्रीच्या मदत करतील अशा संस्थेची आवश्यकता भासु लागली.

यामधून देशात वेगवेगळया राज्यात बाजार समित्या होउ लागल्या. याच पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यासाठी राज्यस्तरावर नाफेडची २ ऑक्टोबर १९५८ साली स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्य सन १९६३ साली “कृषी उत्पन्न बाजार समिती” या अधिनियम १९६३ म्हणून ओळखले जाऊ लागली. नंतर जिल्हास्तरावर जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यात आली असून या समितीचे सर्व व्यवहार हे जिल्हाधिकारी यांच्या देखरेखी खाली पार पाडले जातात.

दि. ३०/०३/२०१४ च्या अखेर महाराष्ट्र सर्व जिल्हयांमध्ये ३०५ बाजार समिती व ६०३ उपबाजार कार्यरत आहे. महाराष्ट्रातील कार्यरत असलेल्या बाजार समित्यांची विभाग निहाय संख्या खालीलप्रमाणे आहे.

**बाजार समित्यांच्या विभाग निहाय संख्या**

| अ. नं. | विभाग | मुख्य बाजार | उपबाजार |
|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | २० | ४२ |
| २ | नाशिक | ३८ | ८९ |
| ३ | पुणे | ३८ | १०३ |
| ४ | औरंगाबाद | २९ | ६३ |
| ५ | लातूर | ५६ | ८५ |
| ६ | अमरावती | ५५ | ९३ |
| ७ | नागपूर | ४८ | ७८ |
| ८ | कोल्हापूर | २१ | ५७ |
| | एकूण | ३०५ | ३०६ |

आधार महाराष्ट्र कृषीपणन मंडळ वार्षिक अहवाल सन २०१२ — २०१३.

## २. साहित्य पडताळा.

१) डॉ. महेश कुलकर्णी, डॉ. प्रमोद बियाणी, डॉ रविंद्र देशमुख
“विपन्न व्यवथापन” निराली प्रकाशन (सन २०१०) पान नं. ५१.

शेतमालाचे विपणन कोणत्याही व्यवसायाचे यश त्यांच्या उत्पन्नाच्या कार्यक्षम बाजार पेठेवर अवलंबून असते. भारतातील शेती व्यवसायात नविन तंत्रज्ञानामुळे शेतमालाच्या उत्पादनात वाढ झाली. परंतु शेतक—यांच्या उत्पन्नात फारशी वाढ केली नाही. शेतक—याच्या उत्पन्नात वाढ न होण्याचे महत्वाचे कारण शेती विपणनाच्या पध्दतीतील अपूर्णतता होय.शेतक—यांचे अर्थिक समृध्दता ही त्यांनी उत्पादित केलेल्या पिकांवर संख्येवर व गुणवत्तेवरच केवळ अवलंबुन नसते तर उत्पादीत वस्तुला बाजारपेठ किती प्राप्त होते. यावर अवलंबून असते.

२) डॉ. गंगाधर कायंदे पाटील — शेतीचे अर्थशास्त्र,कृषी अर्थशास्त्र, शेतीचे अर्थशास्त्र:सिध्दांत आणि धोरण, चैतन्य पब्लिकेशन( सन २००८)पान नं. ३.३४

भारतीय शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी भारत सरकारने केलेले प्रयत्न सन १९५१ पासून भारतात पंचवार्षिक योजनांचे यूग सुरू झालेले आहे. तेव्हा पासून ९व्या पंचवार्षिक योजने पर्यंत भारत सरकारने आणि वेगवेगळया राज्यांनी कृषीची उत्पादकता वाढविण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न केलेले आहे.

३) संशोधक प्राध्यापक बी. एल. पवार, मार्गदर्शक डॉ. जे. आर. भोरण
“महाराष्ट्रातील नाशिक जिल्हयातील कांदा उत्पादन व विपणनाचे विश्लेषाणात्मक अध्ययन”(अध्ययन वर्षे १९९१—२०००)

प्रस्तुत, संशोधनामध्ये कांदयाचे आहारात असणारे महत्व तसेच कांदयाची लागवड, प्रतवारी, साठवणूक किंवा विपणन व्यवस्था यांचा सखोल अभ्यास केला गेला आहे.

४) डॉ. तायडे विद्या विश्वासराव (सन ऑक्टोबर २०१०) ‘‘भाजीपाला उत्पन्नातील समस्या’’ शेती मित्र पान नं. ३२

भाजीपाला पिकांच्या लागवडील समस्या ओळखुन त्यावर अधिक संशोधन होवुन वाढीसाठी योग्य तंत्रज्ञानाची शिफारस होण्याची आज आवश्यकता आहे.
भाजीपाला पिकाखाली क्षेत्र वाढविण्यास आज ब—याच मोठा वाव दिसत असला तरी अन्नधान्य खालील क्षेत्र कमी होण्याची शक्यता आहे.

**३) समस्या विधान**

नाशिक जिल्हयातील निवडक कृषी उत्पन्न बाजार समितीमधील भाजीपाला विपणनाच्या समस्या आणि प्रगतीचे अध्ययन सन २००१—२०१०

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V Issue – VI April 2017

**४) संशोधन विषयाचे अभ्यासाचे महत्व**

भारतीय शेतकरी अज्ञानी व संघटीत असलेल्या फायदा व्यापारी व मध्यस्थी घेत असल्यामुळे बाजारात गैरव्यवहारात आणि शोषणास मोठा वाव होता. विपणन व्यवस्था अधिक–अधिक सचोटीची व्हावी. शेतक–यास त्यांच्या मोबदला मिळावा अशा सर्व उद्देशाने देशात नियंत्रीत बाजार पेठा स्थापन करण्यात आलेल्या आहे. शेतक–यांचा माल योग्य किंमतीला जाहिरपणे निलाव होवून विकला जातो म्हणून महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात आली.

कृषी विपणन व्यवस्थेमध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची भुमिका अत्यंत महत्वाची वाढते यासाठी त्याचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

**५) संशोधनाची उद्दिष्टये**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहे.

१. नाशिक जिल्यातील भाजीपाला उत्पादक शेतक–यांच्या या पिकाकडे वळण्याची कारणे समजुन घेणे.
२. भाजीपाला विपणनाची वर्तमानपनाची वर्तमानपध्दतीचे अध्ययन करणे.
३. भाजीपालाचे प्रमाणिकरण संवेष्ठने आणि माल पाठविण्याच्या समस्या जाणुन घेणे.
४. नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये खरेदीविक्रीच्या व्यवहारात मध्यस्थांची साखळी कमी करण्यात कितपत यशस्वी झाले यांची चिकित्सा करणे.
५. भाजीपाला उत्पादक शेतक–यांच्या त्या पिकापासून येणा–या खर्च व लाभाचे विश्लेषण करणे.

**६) संशोधनाची गृहितके**

प्रस्तूत संशोधन विषयाच्या अभ्यासाची खालील गृहितके ठरविण्यात आली होती.

१. नाशिक कृषी बाजार समितीच्या कृषी उत्पदनाची उलाढाल वाढत्या प्रमाणात दिसुन येते.
२. नाशिक कृषी उत्पन्न बाजर समिती शेतक–यांना आवश्यक त्या सेवा पुरवून मध्यस्थांनी साखळी कमी करण्यात यशस्वी झालेली आहे.
३. नाशिक जिल्हयात कृषी उत्पन्न बाजर समिती भाजीपाला उत्पादक शेतक–यांना रास्त भाव मिळत नाही.
४. विविध अनुदान आणि भरपूर लाभ यामुळे नाशिक कृषी उत्पन्न बाजार

समितीची आर्थिक दृष्टया प्रगती होत आहे.

**७) संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधानाच्या अभ्यासासाठी व माहिती गोळा करण्यासाठी खालील साधने व पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**अ. प्राथमिक साधने** — प्राथमिक साधनांच्या अंतर्गत प्रश्नावली मुलाखती व निरीक्षण इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

अभ्यास करण्यासाठी नाशिक जिल्हयातील सात तालुक्यांची निवड करण्यात आलेली आहे. भाजीपाला विपणनाच्या समस्येचा अभ्यास करण्यासाठी पंधरा कमिटयांपैकी ७ कमिटया अभ्यासाठी निवडल्या होता. प्रत्येक तालुक्यातील तीन गावांमधुन यादृच्छिक पध्दतीने शेतकरी निवडून त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेतली. अशा एकूण २१० शेतक—यांकडून प्रश्नावली भरून घेतली तसेच प्रत्येक कमिटीमधुन एक अध्यक्ष व तीन व्यापारी असे ७ अध्यक्ष व २१ व्यापा—यांची मुलाखत घेतली.

**ब. दुय्यम साधने** — दुय्यम साधनांच्या अंतर्गत संदर्भ ग्रंथ, संशोधन अहवाल, वर्तमान पत्रातील लेख, नियतकालिके मासिक व समित्यांचे अहवाल वेबसाईट इत्यादींचा वापर करण्यात आला.

**८. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

महाराष्ट्रात विशेषत: नाशिक जिल्हा कांदा उत्पादन व विपणनाच्या बाबतीत अग्रेसर आहे. म्हणून संशोधन यशस्वीरित्यापूर्ण करण्यासाठी संशोधन व्याप्ती महाराष्ट्र राज्या ऐवजी त्यात सर्वात आधी कांदा उत्पादन घेणा—या नाशिक जिल्हयाची फक्त निवड केलेली आहे. नाशिक जिल्हयातील खाली प्रमुख तालुके अभ्यासाठी घेतलेले आहे. १. नाशिक, २. दिंडोरी, ३. सिन्नर, ४. कळवण, ५.देवळा, ६. बागलाण, ७. निफाड जिल्हयामध्ये दहा तालुक्याचा समावेश असला तरी देखील मोठया प्रमाणावर कांदा उत्पादन घेणा—या वरील तालुक्यांची जाणीपूर्वक निवड केली आहे. नाशिक जिल्हयातील भाजीपाला उत्पादक शेतक—यांचा अभ्यास करण्यासाठी २००१—२०१० या कालावधीची निवड केलेली आहे.

**९) निष्कर्ष**

१. नाशिक जिल्हयातील शेतकरी भाजीपाला उत्पादनाकडे वळण्याची कारण म्हणजे अन्नधान्य उत्पादनापेक्षा भाजीपाल्यात जास्त उत्पादन मिळते.

२. नाशिक जिल्हयातील भाजीपाला उत्पादक शेतकरी स्थानिक बाजारात आपला माल विकणे पसंद करतात. एकुण ७०.४६ टक्के शेतकरी माल स्थानिक

बाजारात विकतात.

३. एकरी भाजीपाला उत्पादनाचा खर्चाचा विचार करता तो भाजीपाल्यानुसार बदलतांना दिसतो. उदा. ढोबळी मिर्चीला शेडनेटमुळे जास्त खर्च येतो.

४. १०० टक्के भाजीपाला उत्पादक शेतकरी मालाची प्रतवारी करतात असे दिसून येते. मालाचे प्रमाणिकरण संवेष्टन व माल पाठविण्याची योग्य ती काळजी शेतकरी घेतांना दिसून येतात.

५. नाशिक जिल्हयातील ३६.६६ टक्के शेतकरी माल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकण्याचे पसंत करतात.

६. ६७.६१ भाजीपाला उत्पादक शेतकरी रास्त भाव मिळतो असे सांगतात तर मिळत नाही असे ३२.६८ असे शेतकरी सांगतात या वरून भाजीपाला शेतक—यांना रास्त भाव मिळतो यांची पृष्ठी करता येईल.

७. कृषी उत्पन्न बाजार समितीत माल साठवणुकीसाठी काहीच नाही असे ५२.८५ टक्के शेतकरी सांगतात यावरून जागे अभावी कृषी उत्पन्न बाजार समितीला साठवणुकीची सोय उपलब्ध करून देता येत नाही.

८. कृषी उत्पन्न बाजार समितीत माल विकतांना भाजीपाला उत्पादक शेतक—यांना विविध अडचणी येतात.

९. ६४.७६ टक्के शेतकरी सांगतात की, बाजार समिती मार्फत शेतक—यांसाठी मागदर्शन पर व्याख्यान चर्चा व मेळावे इत्यादींचे आयोजन केले जाते.

१०. कृषी उत्पन्न बाजार समितीतील भाजीपाला विपणनाचे सारख्या समस्या जाणवतात सर्व व्यापारी व अडते यांच्याकडुन एक सारखे उत्तर मिळाले यावरून असा निष्कर्ष येतो की, बाजार समितीला जोगेचे कमतरता, वाहतूक कोंडी व मजुर मिळत नाही. या समस्या जाणवतात.

११. कृषी उत्पन्न बाजार समिती ज्या सेवा सुविधा पुरविते त्यामध्ये दरवर्षात वाढ होतांना दिसते.

१२. बाजार समितीचे कामकाज समाधान कारक पणे चालते. तसेच आवक वाढविण्यासाठी बाजार समिती आपल्या पातळीवर प्रयत्न करते.

१३. कृषी उत्पन बाजार समिती शेतक—यांच्या विकासासाठी व विपणन समस्या दुर करण्यासाठी प्रयत्न करतांना दिसतात.

*१०. संदर्भ सूची*


- प्रा. डॉ. गंगाधर कायंदे – पाटील (सन २००८) ''शेतीचे अर्थ शास्त्र: सिध्दांत आणि धोरण'' चैतन्य पब्लिकेशन नाशिक.
- डॉ. कुलकर्णी महेश, डॉ. बियाणी प्रमोद, डॉ. देशमुख रविंद्र (सन २००९) विनणन व्यवस्थापन – निराली प्रकाशन.
- डॉ. कायंदे – पाटील (सन २००६) ''संशोधन पध्दतीत'', चैतन्य पब्लिकेशन नाशिक – ३.
- संशोधक बी. एल. पवार मार्गदर्शक डॉ. जे. आर. भोर, 'महाराष्ट्रातील नाशिक जिल्हातील कांदा उत्पादन व विपणनाचे विश्लेषत्मक अध्ययन'' (१९९१–२०००)
- डॉ. तायडे विद्या विश्वासराव (ऑक्टोबर २०१०) ''भाजीपाला उत्पादनातील समस्या'' शेतीमित्र पान नं. ३२
- डॉ. सुधीर भोंगळे (२००५) ''विकास वाटा'' सुज्ञान प्रकाशन पुणे.
- कृषी पणन मित्र, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे, फेब्रुवारी २०१२ व जूलै २०१२
- कृषी उत्पन्न बाजार समिती अहवाल विविध वर्षाचे अहवाल.
- गजानन भारती (२०१२) प्रथम अवृत्ती ''महाराष्ट्रातील कृषी बाजार व्यवस्था व कायदयातील सुधारणा'', महाराष्ट्र ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा, संपादक दि. व्य. जहागिरदार, सेंटर फॉर एकॉनॉमिक्स ॲण्ड सोशल स्टडीज, अमरावती २०१२, प्रथम आवृत्ती ४७ व ५७
- दैनिक सकाळ ॲग्रोवन दि.२ सप्टेंबर २०१२ पान नं. ११.
- www.msamb.com
- www. Agri.maha.nic.in